ESTD 1962

"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक, संचालक, समन्वयक व प्रशासकीय अधिकारी/सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 प्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये मिळणा-या वेतनावर आयकर विभागाच्या निर्देशानुसार आयकर कपात केली जाते.

तथापी वित्त व लेखामंत्रालय, आयकार विभाग, भारत सरकार यांचे आयकर करप्रणालीबाबतचे निर्देशानुसार विद्यापीठातील जे घटक जुन्या आयकरप्रणाली नुसार आपला आयकर भरणा करणार असतील त्यांनी सन 2024-25 या आर्थिक वर्षामधील आपले अपेक्षित उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली / येणारी रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Employee Corner येथे Additional Earning & Investment यामध्ये भरणे आवश्यक असून खालीलपैकी ज्यामध्ये आपली गुंतवणूक केलेली आहे त्याची रक्कम (तिमाही/सहामाही/वार्षिक) प्रमाणे माहिती भरावी.

| Section | Particular | शेरा |
|---|---|---|
| 80 C | LIC/MUTUAL FUND | दरमहा वेतनातून कपात होत असल्यास पुन्हा स्वतंत्र नमुद करू नये |
| | NSC/PPF | |
| | ANY OTHER | |
| | BANK INTEREST (HOME LOAN) | |
| | BANK PRINCIPLE (HOME LOAN) | पतसंस्था यांचे मुद्दलाची रक्कम नमुद करू नये. |
| | TUTION FEE | शाळा/महाविद्यालय यामधील फक्त Tution Fee या सदराखालील रक्कम नमुद करावी. पावतीमधील अन्य कोणतेही शुल्क नमुद करू नये. |
| | SUKANYA YOJNA | |
| 80 E | EDUCATION LOAN INTERST | |
| 80 U | DISABILITY | (As per Medical Certificate Disability Percentage Rate) |
| 80 D | MEDICLAIM | |

सदर रक्कम भरतेवेळी ज्या सेवकांच्या दरमहा वेतनातून एल.आय.सी., भ.नि.नि. इ. ची रक्कम कपात होत असलेस त्याच्या नोंदी सदर ठिकाणी करू नयेत. तसेच जे सेवक अपंग आहेत त्यांनी उपरोक्त तक्त्यामध्ये नमुद DISABILITY या सदराखाली अपंगप्रमाणपत्रावर किती टक्के अपंगत्व नमुद केले आहेत याची खातरजमा करून त्यानुसार आयकरामध्ये मिळणारी सुट याची रक्कम नमुद करावी.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/अधिकारी व प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रमाणे आवश्यक माहिती unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Employee Corner येथे भरावी.

शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2024-25/314

दिनांक- 22 एप्रिल 2024

वित्त व लेखाधिकारी

सोबत : वरील प्रमाणे.

टिप :
1. सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.
2. तसेच सर्वांनी आपल्या विभागातील वर्ग 04 चे जे सेवक आहेत त्यांना याबाबत माहितीदेवून त्यांची माहिती भरणेकामी सहकार्य करावे.
3. नमुद केलेल्य माहितीबाबत आवश्यक कागदपत्रे कार्यालयीन कामकाजास आवश्यकता वाटलेस त्या त्या वेळी संबंधितांकडून मागणी केलेनंतर ती कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील याची कृपया नोंद घ्यावी.

C:\Users\HP\Desktop\PAYBILL DVY\Dhairyasheel\IT REPORT MONTHLY\saving\2024-25\circular.docx

Scanned with OKEN Scanner